सकाळ | लातूर
औरंगाबाद, मंगळवार, १ फेब्रुवारी २०२२
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800


# भाषिक कौशल्यातून रोजगाराची संधी

## प्रा. डॉ. सूर्यवंशी : केंद्रे महाविद्यालयात व्याख्यान

**जळकोट, ता. ३१ (बातमीदार)** : ''आत्मनिवेदन हे भाषेचे प्रमुख कार्य आहे; पण वाचन, लेखन, संभाषण आदी भाषिक कौशल्ये माणसाला त्याच्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी ओळख निर्माण करून देतात. त्यातून त्याला रोजगारही उपलब्ध होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी आपली भाषिक कौशल्ये विकसित करावीत. त्यास नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन नवीन रोजगाराची संधी प्राप्त करावी,'' असे आवाहन अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी यांनी केले.

जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमात 'मराठी भाषा आणि रोजगार' या विषयावर झालेल्या ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने होते. प्रा. डॉ. सूर्यवंशी म्हणाले, ''अलीकडे तंत्रज्ञानाने मराठी भाषेतही काही बदल घडून आले आहेत. पण, मराठी माणसाने तंत्रस्नेही बनून भाषिक कौशल्याला तंत्रज्ञानाची जोड द्यावी. वर्तमान परिस्थितीत मराठी भाषेतील नवीन रोजगाच्या संधी प्राप्त कराव्यात'', असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. लहाने यांनीही विचार व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख प्रा. रामचंद्र पस्तापुरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नवनाथ मुसळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. एस. कांबळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. एन. पी. कुडकेकर, प्रा. एम. बी. कुलकर्णी, प्रा. डॉ. अल्का सोमवंशी, प्रा. डॉ. नामदेव राठोड उपस्थित होते.




**जळकोट : विचार व्यक्त करताना प्रा. यादव सूर्यवंशी. यावेळी उपस्थित प्राध्यापक.**

वतनवाला

● वर्ष – २ ● अंक ११९ ● शुक्रवार दि. १ मार्च २०१९ ● MAHMAR46995

# मराठी भाषा जाणता आली पाहिजे–प्रा. डॉ.होणराव



जळकोट (प्रतिनिधी) मराठी भाषा ही विविधतेने नटलेली असून मराठी भाषा कोमात नसून ती आज जोमात आहे. मराठी भाषा प्रत्येकाना जाणता आली पाहिजे,ज्ञान ही कोणाचीच मक्तेदारी नसल्याचे मत डॉ. दत्ताहरी होणराव (श्री हावगीस्वामी महा. उदगीर ) यांनी भाषा गौरव दिनाचे औचित्य प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणूण बोलताना व्यक्त केले.

संभाजीराव केंद्रे महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी साहित्यातील मुकूटशिरोमणी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी विष्णु वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा गौरव दिन म्हणूण उत्साहात साजरा करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणूण प्राचार्य डॉ.बी.टी. लहाने होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणूण प्रा.डॉ. दत्ताहरी होणराव, उप प्राचार्य प्रा. शिवा जे.एल., मराठी विभाग प्रमुख प्रा.पस्तापूरे आर. एन., प्रा. कांबळे पी. एस.हे उपस्थिती होते.

पुढे बोलताना प्रा.डॉ. होणराव म्हणाले आज भारतात तिसऱ्या क्रमावर बोलली जाणारी भाषा मराठी बोली भाषा असून , प्रत्येकानी माझी भाषा आहे,माझी मायबोली आहे. म्हणूण व्यवहारामध्ये अंगीकारायला शिकले पाहिजे,मराठी भाषेतील लोकसाहित्य ,लोकगीताचा सर्वांनी संर्वधन करायला शिकलो तरच भाषेला चांगले दिवस निश्चितच येईल असे मत मांडले.

यावेळी प्रा.डॉ. कुडकेकर एन.पी. डॉ. टिमकीकर डी.एस., प्रा.डॉ. सोमवंशी ए.बी. यांनी आपली विरोधक, डॉ. घटकार यांनी शेतकऱ्यांच्या वेथा वेदणा सांगणारी दूष्काळ प्रा. जायेवार यांनी मानवतेच पुरस्कार करणारी बोलकी कविता कोण आपले कोण परके ही कविता सादर केले. प्रा. कांबळे पी.एस. यांनी महानायक जन्माला आला नसता तर , प्रा.डॉ. कांबळे एम.एन यांनी माय बापाच्या व्यथा सांगणारी कविता सादर केली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.बी.टी. लहाने या म्हणाले.भाषा प्रत्येक समाजाला समाजातील व्यक्तीना जोडण्याच काम करत असते आपल्या बोली भाषेतील चाली,रिती,रूढी परंपरा यांच्याशी हसत खेळत रहा तरच भाषा सक्षम होईल, संवाद आणि संर्पकासाठी भाषा सारख समृध्द दुसर काहीच नसल्याच मत व्यक्त केल.प्रत्येकानी मराठी भाषां बोली भाषेतून [illegible] उतरून संकल्प कर[illegible] रामदास स्वामी लिहता[illegible] दिसामाजी काहीतरी लिह[illegible] आपण दिसामाजी काहीतरी वाचावे असे विचार प्रत्येकानी अमलात आणून कृतीत उतरविले तरच आजच्या दिवशी साहित्यसम्राट कुसुमाग्रजांची जयंती सार्थक ठरेल असे गौरव उदगार काढले.या कार्यकमाचे प्रस्ताविक प्रा.पस्तापूरे आर. एन. यांनी केले सुत्रसंचलन [illegible] नवनाथ तर आभार [illegible] पी.एस. यांनी मानले.

न्यूज Inbox

# प्रा. पस्तापुरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

जळकोट : येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील प्रा. रामचंद्र पस्तापुरे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य गौरव पुरस्कार श्रीरामपूर येथे आयोजित पहिल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस व आमदार लहुजी कानडे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. पस्तापुरे यांचे कौतुक संस्थाध्यक्ष डॉ. भागवत केंद्रे, प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने, अनिल केंद्रे, डॉ. व्ही. आय. पाटील, डॉ. नामदेव राठोड, डॉ. टी. ई. केंद्रे, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. डॉ. जितेंद्र शेळके, डॉ. एन. पी. कुडकेकर, प्रा. डॉ. माधव कांबळे, डॉ. डी. एस. टिमकीकर आदींनी केले.

सकाळ लातूर
औरंगाबाद, शनिवार, १८ फेब्रुवारी २०२३
TODAY

## दृष्टिक्षेपात

### जळकोट येथील रामचंद्र पस्तापुरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



रामचंद्र पस्तापुरे

**जळकोट :** येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा.रामचंद्र पस्तापुरे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा कार्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार उद्या शनिवारी (ता. १८) श्रीरामपूर येथे आयोजित पहिल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात प्रदान करण्यात येणार आहे. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान (ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते व आमदार लहुजी कानडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मराठी भाषा आणि साहित्य प्रांतातील योगदान लक्षात घेऊन हा पुरस्कार दिला जातो. प्रा. पस्तापुरे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. भागवत केंद्रे, प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने, अनिल केंद्रे, डॉ. व्ही. आय. पाटील, डॉ. नामदेव राठोड आदींनी अभिनंदन केले .



सौजन्य - प्रसिद्धी विभाग

सकाळ | लातूर

औरंगाबाद, मंगळवार, १ फेब्रुवारी २०२२

TODAY

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

# भाषिक कौशल्यातून रोजगाराची संधी

## प्रा. डॉ. सूर्यवंशी : केंद्रे महाविद्यालयात व्याख्यान

**जळकोट, ता. ३१ (बातमीदार) :** ''आत्मनिवेदन हे भाषेचे प्रमुख कार्य आहे; पण वाचन, लेखन, संभाषण आदी भाषिक कौशल्ये माणसाला त्याच्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी ओळख निर्माण करून देतात. त्यातून त्याला रोजगारही उपलब्ध होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी आपली भाषिक कौशल्ये विकसित करावीत. त्यास नवीन तंत्रज्ञानाची जोड देऊन नवीन रोजगाराची संधी प्राप्त करावी,'' असे आवाहन अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी यांनी केले.

जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमात 'मराठी भाषा आणि रोजगार' या विषयावर झालेल्या ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने होते. प्रा. डॉ. सूर्यवंशी म्हणाले, ''अलीकडे तंत्रज्ञानाने मराठी भाषेतही काही बदल घडून आले आहेत. पण, मराठी माणसाने तंत्रस्नेही बनून भाषिक कौशल्याला तंत्रज्ञानाची जोड द्यावी. वर्तमान परिस्थितीत मराठी भाषेतील नवीन रोजगाच्या संधी प्राप्त कराव्यात'', असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ. लहाने यांनीही विचार व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख प्रा. रामचंद्र पस्तापुरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नवनाथ मुसळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पी. एस. कांबळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. एन. पी. कुडकेकर, प्रा. एम. बी. कुलकर्णी, प्रा. डॉ. अल्का सोमवंशी, प्रा. डॉ. नामदेव राठोड उपस्थित होते.



**जळकोट : विचार व्यक्त करताना प्रा. यादव सूर्यवंशी. यावेळी उपस्थित प्राध्यापक.**

७ | लातूर

गुरुवार, दि. १ मार्च २०१८

महत्त्वाचे

होते.

## मराठी भाषा गौरव दिन साजरा

**जळकोट :** राज्य परिवहन महामंडळ, लातूर विभाग व उदगीर आगाराच्या वतीने जळकोट बसस्थानकामध्ये मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी वाहतूक नियंत्रक शिवराज रेगुडे, प्रा. रा. ना. पस्तापुरे, कवी माधव वाघमारे, चंद्रशेखर कळसे, प्रा. कोरे, मौला बागवान यांच्यासह अनेक प्रवासी उपस्थित होते.

वतन वाला

* वर्ष – १ * अंक – १८९ * गुरुवार दि. २९ मार्च २०१८ *MAHMAR46995 * पृष्ठ

# गंगाधर पानतावणे यांना केंद्रे महाविद्यालयाच्यावतीने श्रध्दाजंली

जळकोट प्रतिनिधी – .शाहू, फूले, आंबेडकरी विचारधारेचे समर्थ वाहक, प्रगल्भ कवी, लेखक, सुप्रसिद्ध साहित्यिक , मराठी सांस्कृतिक व सामाजिक परिर्वतनाच्या लढाईतील कृतीशील विचारवंत , दलित साहित्याचे गाडे अभ्यासक , वंचित उपेक्षिताचे कैवारी, प्रथम विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आस्मितादर्शकार पद्मश्री गंगाधर पानतावणे यांना मराठी विभागाच्या व महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ बी टी लहाने यांच्या अध्यक्षते खाली भावपुर्ण श्रध्दांजली अर्पन करण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ.बी टी लहाने यांनी गगांधर पानतावणे यांच्या जिवण कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला दलित साहित्याचा सखोल अभ्यास करून चळवळीना खऱ्या अर्थाने जिवंत ठेवण्याचे कार्य त्यांच्या हातून झाले आस्मिताकार नियतकालिक संपादकाची भुमिका त्यांनी सार्थ निभावली आहे. एकंदरीत त्यांच्या बहूमोल कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना मानाचा पद्मश्री किताब देऊन येथोचित्त सन्मान केला असे म्हणाले .

सकाळ

# बोली भाषा झऱ्यासारख्या प्रवाही असतात : डॉ. मुसणे

**जळकोट :** दररोजच्या व्यवहारात स्वाभाविकपणे बोलली जाणारी बोली ही लवचीक, जीवनसापेक्ष व प्रवाही असल्यामुळे तिच्यातील गोडवा वाखाणण्यासारखा असून जिवंतपणा हे बोलींचे वैशिष्ट्ये महत्त्वाचे आहे. श्रवणीय व आकलन सुलभ बोलीतील नानाविध भावनांचे आरोह-अवरोह बोलण्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष यामुळे बोलीला वेगळेपण प्राप्त होत असते. त्यामुळे विविध बोलीतून निर्माण होणारे साहित्य अथवा विविध भूप्रदेशांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोली या झऱ्यासारख्या प्रवाही असून भाषेला समृद्ध करणाऱ्या आहेत. बोलीच्या वापरामुळे भाषाही समृद्ध होतात. बोली जिवंत राहिल्या तरच भाषा समृद्ध होईल, असे प्रतिपादन आष्टी (जि.गडचिरोली) येथील बोली भाषांचे अभ्यासक डॉ.राजकुमार मुसणे यांनी केले. ते जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त मराठी भाषा आणि बोली या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.टी. लहाने होते. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. रामचंद्र पस्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.नवनाथ मुसळे तर आभार प्रा. डॉ. जगदीश जायेवार यांनी मानले.

Aurangabad, Latur-Today

# बोली ह्या झऱ्यासारख्या जिवंत, प्रवाही असतात:डॉ. राजकुमार मुसणे

जळकोट / बालाघाट नेटवर्क/ प्रा डॉ नामदेव राठोड : दैनंदिन जीवन व्यवहारात स्वाभाविकपणे बोलली जाणारी बोली ही लवचिक, जीवनसापेक्ष व प्रवाही असल्यामुळे तिच्यातील गोडवा वाखाणण्यासारखा असून जिवंतपणा हे बोलीचे वैशिष्ट्ये महत्त्वाचे आहे. श्रवणीय व आकलनसुलभ बोलीतील नानाविध भावनांचे आरोह-अवरोह बोलण्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष यामुळं बोलीला वेगळेपण प्राप्त होत असते. अलीकडे बोलीच्या वापरातून निर्माण झालेलं साहित्य हे त्या त्या भूप्रदेशाचे वैशिष्ट्यानिशी अभिव्यक्त होत आहे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे विविध बोलीतून निर्माण होणारे साहित्य अथवा विविध भूप्रदेशांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोली ह्या झऱ्यासारख्या प्रवाही असून भाषेला समृद्ध करणाऱ्या आहेत.उच्चारण,लकब, शब्दाघात यामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरतात. बोलीच्या वापरामुळे भाषाही समृद्ध होतात.बोली या भाषेकरिता झऱ्यांसारखे कार्य करून भाषेचा आवाका विस्तारतात.


बोली जिवंत राहिल्या तरच भाषा समृद्ध होईल. असे प्रतिपादन डा. राजकुमार मुसणे यॉंनी केले.

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट येथील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी भाषा आणि बोली या विषयावर डॉ.मुसणे यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले त्याप्रसंगी ते पुढे बोलतांना कोकणी, मालवणी, अहिराणी, बंजारा गोरबोली, गोंडी,

तावडी बोली, वऱ्हाडी बोली, लेवा पाटीदार बोली, पारधी बोली , ढीवरी बोली, झाडीबोली , मराठवाडी या बोलीतील स्वरूपाचे सोदाहरण स्पष्टीकरण केले. व्यावसायिकाभिमुख विविध बोलींचे शब्दक्षेत्र, अर्थाभिव्यक्ती, एकंदर स्वरूप व वैशिष्ट्ये यांची सविस्तर मांडणी महात्मा जोतीबा फुले महाविद्यालय आष्टी,जि.गडचिरोली येथील बोलीचे अभ्यासक प्रा.डा. राजकुमार मुसणे यांनी केली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी.टी. लहाने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठीतील बोलीवर सविस्तर आढावा घेत बोली जिवंत राहिल्या तरच भाषा समृद्ध होईल असे सुतोवाच काढले व विविध बोलीचे उदा. दिले. या बहारदार कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख प्रा. रामचंद्र पस्तापुरे यांनी करून दिला .

सुत्रसंचल प्रा.नवनाथ मुसळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. जगदिश जायेवार यांनी माणले . यावेळी डॉ. कुडकेकर एन.पी. प्रा. महेश कुलकर्णी, डॉ. अल्का सोमवंशी , प्रा. पी.एस. कांबळे, डॉ. माधव कांडणगीरे, डॉ. नामदेव राठोड, डॉ. टी ई . केंद्रे ' वेगवेगळ्या शाळा महाविद्यालयातील प्राध्यापक सहकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



sakal.com

औरंगाबाद, गुरुवार,
१ मार्च २०१८

३



जळकोट : येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकात आयोजित कार्यक्रमात बोलताना चंद्रकांत कळसे.

